# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १४२/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. देवदत्त वामनराव दाभाडे,<br>मोरेश्वर, सिटी सर्व्हे नं. ९९४,<br>गांवभाग,<br>सांगली. | अपेलंट |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>मंडळ कार्यालय, विश्रामबाग,<br>सांगली.<br><br>२) कार्यकारी अभियंता (शहर),<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br><br>शहर विभाग, हिराबाग वॉटर वर्क्सजवळ,<br>सांगली.<br><br>३) उपकार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>शहर दक्षिण उपविभागीय कार्यालय,<br>सांगली.<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**कोरम :-** १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

तक्रारदार श्री. दाभाडे व विरूध्द पक्षकार यांनी सादर केलेली कागदपत्रे, कथने यांचा विचार करता मंचाच्या निदर्शनास खालील गोष्टी आल्या आहेत.

श्री. देवदत्त वामनराव दाभाडे, रा. सांगली यांच्या तक्रारीचे सर्वसाधारण स्वरूप खालील प्रमाणे आहे –

श्रीमती शारदाबाई वामनराव दाभाडे, यांच्या नावे असलेली सुरक्षा रक्कम व्याजासह परत मिळावी. श्रीमती शारदाबाई वामनराव दाभाडे यांच्या नावांवरील कनेक्शन ग्राहक क्र. २७९९४०१९४२०७/५ हे श्री. देवदत्त वामनराव दाभाडे या नावांवर करून मिळावे तसेच नावांत बदल करीत असताना जादा रकमेचे कोटेशन दिले ते नियमाप्रमाणे योग्य होऊन मिळावे इ. मागण्यासाठी श्री. देवदत्त दाभाडे यांनी वेळोवेळी मागणी व तक्रार अर्ज केल्याचे दिसून येते. त्यासाठी श्री. दाभाडे यांनी वितरण कंपनीच्या उपकार्यकारी अभियंता, दक्षिण उपविभाग, सांगली शहर यांचेकडे केलेले पत्रव्यवहार दाखल केला आहे. वेळोवेळी प्रयत्न करूनही दाद न मिळाल्याने प्रथमत: २१–६–०७ रोजी व नंतर दुस–यांदा ८–१०–०७ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल यांच्याकडे "क्ष" प्रपत्रामध्ये तक्रार केल्याचे दिसून येते. नोडल ऑफीसर, सांगली मंडल यांनी दिलेल्या दोन्ही आदेशाचे समाधान न झाल्याने श्री. दाभाडे यांनी "अ" प्रपत्राने दि. १–१२–०७ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल येथे तक्रार दाखल केली आहे.

वीज वितरण कंपनीचे दक्षिण शहर उपविभाग सांगली यांनी अनामत रक्कम रू. ३२०/– वरील व्याज वेळच्यावेळी दिले असल्याचे नमूद केले आहे. तसेच रू. २००/– ही रक्कम संगणक प्रणाली चालू करतांना नजर चुकीने नोंदविणेची राहिली आहे. त्यामुळे ग्राहकाने सदरची चूक आमचे निदर्शनास आणून देताच तशा पध्दतीचे जमाखर्च करून घेतले आहेत. क्र. १६२ दि. १८–१०–०७ च्या पत्राने उपकार्यकारी अभियंता, दक्षिण उपविभाग, सांगली शहर यांनी वरीष्ठांकडे रू. २००/– ही रक्कम व त्यावरील होणारे व्याज देणे विषयी कळविले असल्याचे दिसून येते. तसेच क्र. सांगली/आस्था/१५६७ दि. १२–११–०७ च्या पत्राने रू. २००/– व त्यावरील व्याज रू. ६५/– ऑगस्ट २००७ अखेरचे श्री. दाभाडे यांचे नांवावर जमा केल्याचे कळविले आहे. अनामत रक्कम रू. ५२०/– चा धनादेश मयत श्री. शारदाबाई दाभाडे यांच्या नांवावर काढण्याची चूक झाली असल्याचे वितरण कंपनीने मान्य केले आहे. परत धनादेशवरील नांवात बदल करून धनादेश देतांना श्री. दाभाडे यांनी प्रथमत: टाळाटाळ केली पण हक्क सुरक्षित ठेऊन सदरचा धनादेश स्वीकारल्याचे नमूद केले आहे.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षात "क्ष" फॉर्ममध्ये तक्रार नोंद झाल्यावर नोडल ऑफीसर , सांगली मंडल यांनी दि. २०–११–०७ च्या आदेशात चुकीच्या कार्यपध्दतीबद्‌दल संबंधितांवर योग्य कारवाईच्या सूचना दिल्या आहेत. पहिल्या दि. २७–७–०७ च्या आदेशात चुकीची पुनरावृत्ती होऊ नये असे सुचविले आहे.

सदर प्रकरणाची सुनावणी दि. २–१–०८ रोजी म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सांगली शहर विभाग येथे दु. १२.५० ते १३.५० वेळेत करण्यात आली. यावेळी स्वत: तक्रारदार तर विरूध्द पक्षा तर्फे श्री. पी.जे. जेधे, कार्यकारी अभियंता–नोडल ऑफीसर, सांगली मंडल, श्री. एस.बी. कचरे, उपकार्यकारी अभियंता, सांगली शहर, दक्षिण उपविभाग, श्री. ए.जे. मेहता, सहा.अभियंता, शहर विभाग, सांगली, श्री. यु.अे. हिंमतबहादुर, कनिष्ठ लिपीक, श्री. सी.बी. पाटील, वरीष्ठ लिपीक हे उपस्थित होते.

ग्राहक, वितरण कंपनी, नोडल ऑफीसर, सांगली यांच्याकडून सुनावणीच्या दरम्यान दाखल केलेली कागदपत्रे, म्हणणे यावरून सर्वसाधारणपणे मंच खालील निष्कर्षाप्रत आला आहे.

श्रीमती शारदाबाई वामनराव दाभाडे या दि. १२–११–२००० रोजी मयत झाल्याचे दिसून येते. श्रीमती दाभाडे या मयत झाल्यावर वटमुखत्यार पत्राच्या आधारे श्री. देवदत्त दाभाडे यांनी नांवात बदल करणेसाठी

दि. ५–२–०७ रोजी अर्ज केल्याचे दिसून येते. सदरच्या अर्जास अनुसरून उपकार्यकारी अभियंता, दक्षिण उपविभाग, सांगली शहर यांनी कार्या.पत्र क्र. ४०५ दि. २१–३–०७ ने अनामत रक्कम भरणेसाठी फर्म कोटेशन दिले. सदरचे कोटेशन योग्य नसलेकारणावरून श्री. दाभाडे यांनी वकीला मार्फत १९–४–०७ रोजी नोटीस दिल्याचे दिसते. तसेच जुन्या अनामत रकमेच्या पावत्या हजर करणेस सांगून नवीन कोटेशन दिले ते न भरता श्री. दाभाडे यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल यांच्याकडे "क्ष" प्रपत्रामध्ये तक्रार दाखल केल्यावर दि. २१–३–०७ रोजी दिलेले रू. ३७२५/– चे फर्म कोटेशन दोन वेळा दुरूस्त करून शेवटी रू. ४७५/– इतक्या रकमेचे कोटेशन दिले ते श्री. दाभाडे यांनी दि. १०–८–०७ रोजी भरल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात क्र.उपकाअभि/सां/द.वि/११०२ दि. १३–७–०७ च्या पत्राने श्री. दाभाडे यांना ७–७–०७ पासून आपल्या अर्जातील मागणीप्रमाणे "नावांत बदल" केल्याचे दिसून येते. दि. ५–३–०७ पासून दि. ७–७–०७ इतका प्रदीर्घ कालावधी का लागला ? याचा मागोवा घेतल्यास असे निदर्शनास येते की वितरण कंपनीचे अधिकारी कोणताही विचार न करता मनमानी पध्दतीने फर्म कोटेशन देतात. ग्राहकाने "नावांत बदलासाठी" सर्व कागदपत्रे हजर केल्यावर चुकीचे / जास्त रकमेचे फर्म कोटेशन दिल्यामुळे
ग्राहकास वकिलामार्फत नोटीस/पत्र द्यावे लागले आहे. त्यास वि.प. जबाबदार आहे असे मंचाचे मत आहे. प्रथमत: रू. ३७२५/– चे दुस–यांदा रू. २२००/– चे व तिस–यांदा रू. ४७५/– चे कोटेशन द्यावयाचे हे भोंगळ कारभाराचे प्रतिक आहे. वि.प. ने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ मधील तरतूद १०.४ चा भंग केला असल्याचे सिध्द होत आहे. नावांतील बदलासाठीच्या अर्जाच्या दिनांकापासून दुस–या देयक चक्राच्या आंत ग्राहकास वि.प.ने कळवून बदल करणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात दि. ५–३–०७ ला अर्ज आल्यावर दि. ५–५–०७ च्या आंत तसे कळविणे कायदेशीर होते तसे न करता दि. ७–७–०७ इतका प्रदीर्घ कालावधी लागला आहे. म्हणून संबंधित दंडात्मक कार्यवाहीस पात्र वाटतात.

तसेच मयत श्रीमती दाभाडे यांच्या नांवावरील अनामत रक्कमेपैकी रू. २००/– नोंद्य नसणे हेही अत्यंक चिंताजनक आहे. एरव्ही अनामत रक्कमेची मूळ पावती ग्राहकाकडे मागून पावती न सापडल्यास इतर कायदेशीर कार्यवाही पूर्ण करणेस लावणा–या वि.प.ने ग्राहकाने रू. ३२०/– व रू. २००/– च्या मूळ पावत्या सादर करूनही हेलपाटे मारावे लागले व पत्रव्यवहार करावा लागला आहे. त्यास वि.प. कडील अधिकारी व लेखा खात्यातील कर्मचारी जबाबदार आहेत असे मंचाचे ठाम मत आहे. "नावांत बदल" चा अर्ज व त्यावरील तक्रार याची सर्वांना कल्पना असूनही मयत श्रीमती दाभाडे यांच्या नांवावर धनादेश (अनामत रक्कमेचा) काढणे अत्यंत अयोग्य आहे. त्यासाठी श्री. दाभाडे यांना ब–याचवेळा पत्रव्यवहार व स्मरणपत्रे द्यावी लागल्याचे दिसून येते. श्री. दाभाडे यांनी "नावांत बदल" चा अर्ज करतांना सोबत आवशक्य ती कागदपत्रे जोडलेली होती. मयत श्रीमती दाभाडे यांचे ३० दिवसांत खाते कायमचे बंद करून सदर नावांवरील अनामत रककम श्री. देवदत्त दाभाडे यांच्या नावांवर वर्ग करून लागणारी आवशक्य रक्कम भरणेसाठी सांगणे योग्य होते. तसे न करता वेगवेगळ्या रक्कमेची फर्म कोटेशन देऊन तसेच रू. २००/– ची अनामत रक्कम संगणकावरील नोंदीच्या वेळी राहून गेल्याचे सांगून वि.प.ने व्यवस्थापनातील भोंगळपणा दाखवून दिला आहे. त्यास वि.प.चे अधिकारी व कर्मचारी जबाबदार आहेत.

सर्व कागदपत्रांचा, सुनावणीवेळी हजर केलेले कागदपत्र, कथने यांचा एकत्रित विचार करून मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) दि. २७–७–०७ व दि. २०–११–०७ चे अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचे आदेश अंशत: रद्‌द करणेत येत आहेत.

2) "नावांतील बदल" व "खाते कायमचे बंद करणे" या दोन्ही मागणींचा एकत्र विचार करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ मधील परिशिष्ट "अ" मधील तरतूद क्र. ९.२, ९.४ तसेच १०.४ प्रमाणे वि.प. हे दंडात्मक कार्यवाहीस पात्र आहेत.

३) दि. ५–३–०७ चा अर्ज सर्व कारणासाठी ग्रहीत धरून दि. ५–५–०७ ते ७–७–०७ या कालावधीसाठी वि.प. ने रू. १०००/– (विलंबाच्या प्रत्येक आठवड्यास किंवा त्याच्या भागास रू. १००/– प्रमाणे १० आठवडे) श्री. देवदत्त दाभाडे यांना ९० दिवसांत बिलातून आदा करावेत व राहिलेली उर्वरित रक्कम धनादेशाव्दारे देण्यात यावी.

४) वि.प.स झालेल्या आर्थिक नुकसानीबद्‌दल खातेनिहाय चौकशी करून सदरची रक्कम वसूल करावी.

५) रू. २००/– या अनामत रकमेवरील व्याजाचा हिशोब श्री. देवदत्त दाभाडे यांना समजावून सांगावा व तसे झाल्यावर त्यांच्याकडून तक्रार नसल्यास लिहून घ्यावे.

६) सदर आदेशाची अंमलबजावणी ९० दिवसांत करणेत यावी व तसे केलेचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतुदीनुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

७) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल "केशवा" बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व),मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

( एस.आर बांबळे )
सदस्य–सचिव
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

पत्ता–मोरेश्वर, सिटी सर्व्हे नं. ९९४, गांवभाग, सांगली येथे व्यापारी वीज कनेक्शन क्र. २७९९४०१९४२०७/५ आहे. शारदाबाई वा.दाभाडे या २००० साली मयत झाल्या असून तत्पूर्वी त्यांनी कुलमुखत्यार पत्राने वारसदार श्री. देवदत्त वामनराव दाभाडे यांना त्यांचे मालमत्तेचे व्यवहार अधिकार हक्क दिलेले आहेत. सदर वीज कनेक्शन शारदाबाई यांचे नांवावरून देवदत्त वा. दाभाडे यांचे नांवावर करून घेणेसाठी वितरण कंपनीकडे ५–३–०७ रोजी अर्ज सादर केला. प्रथम त्यांना त्यांचे नांवे मिटरची किंमत समाविष्ट केलेले नवीन कोटेशन भरणेस कळविले. नंतर सदर कोटेशन ग्राहकाचे तक्रारी वरून रद्द केले व सुधारीत रकमेचे कोटेशन दिले. नंतर कै. शारदाबाई यांचे नांवे असलेली दोन भागात भरलेले डिपॉझिट रक्कम त्यांचे नांवे करणे ठरले. त्यांचे एका भागाची रक्कम वर्ग नव्हती. रक्कमेचा चेक काढताना मयत आईचे नांवावर काढला. त्यावरील व्याजाचा तपशील दिला नाही. एकदंरीत सदर कामास विलंब लागला व मनस्ताप, हेलपाटे झाले. अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली येथे विहित नमुन्यात तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने दि. २७–७–०७ रोजी निर्णय दिला आहे.

याबाबत तक्रारदार यांचे तक्रारीचे स्वरूप तथा त्यांचे म्हणणे खालील प्रमाणे आहे.

शारदाबाई वामनराव दाभाडे, रा. मोरेश्वर, सिटी सर्व्हे नं. ९९४, गांवभाग, सांगली येथे वीज कनेक्शन क्र. २७९९४०१९४२०७/५ आहे त्यांनी त्यांचे वारसदार मुलास श्री. देवदत्त वामनराव दाभाडे यांना त्यांचे तेथील मालमत्तेचे व्यवहार करणेस कुलमुखत्यार पत्राने हक्क दिले आहेत. शारदाबाई यांचे सन २००० मध्ये निधन झाले असून त्यांचे नावांवरील सदर वीज कनेक्शन स्वतःचे नांवावर करून घेण्यास त्यांनी वितरण कंपनीकडे दि. ५–३–०७ रोजी अर्ज दिला. त्यावर वितरण कंपनीने पत्र क्र. उकाअ(दवि)/४०५ दि. २१–३–०७ ने अनामत रक्कम म्हणून भरणेकरिता मिटरचे रकमेचा समावेश असलेले भरमसाठ रकमेचे कोटेशन दिले. त्यास त्यांनी वकिलाचे नोटीस देऊन दाद मागितली. नंतर वितरण कंपनीकडून डिपॉझिट म्हणून एक महिन्याचे बिलाइतके रू. ४७५/– चे कोटेशन दिले ते त्यांनी भरले. दरम्यान १६–६–०७ रोजी अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल यांचेकडे तक्रार दिली. त्याची सुनावणी दि. ९–६–०७ रोजी होऊन १३–७–०७ रोजी सदर कनेक्शनचे नावांत बदल करणेचा आदेश काढला गेला.

शारदाबाई दाभाडे यांचे नांवे डिपॉझिट रू. ३२०/– पा.क्र. १३७४४८३ दि. १६–१०–९७ व रू. २००/– पा.क्र. १०९७१५३ दि. ३०–४–९८ अशा दोन वेगवेगळया रकमांत भरलेले आहे. श्री. देवदत्त दाभाडे यांनी कनेक्शन नांव बदलाकरिता नवीन डिपॉझिट भरले असले कारणाने शारदाबाई दाभाडे यांचे नांवे भरलेली डिपॉझिट रक्कम व त्यावरील व्याजाचा तपशील देण्याच्या मागणीसह परत मिळणेस त्यांनी दि. ४–८–०७ रोजी अर्ज देऊन मागणी केली. उपविभागीय कार्यालयाने तो अर्ज पत्र क्र. १२८४ दि. १३–८–०७ ने विभागीय कार्यालयास पुढील कार्यवाहीस पाठविला. दरम्यान ग्राहकाने अनेक हेलपाटे मारलेनंतरही अनामत रक्कम न मिळालेमुळे दि. ३१–८०००७ व दि. २८–९–०७ चे उर्जामित्र सभेत सदर विषय मांडला. तेथे कार्यकारी अभियंता, शहर यांचेकडून कार्यवाही होणेचे शब्दावरून विभागीय कार्यालयाने अडीच महिन्यानंतर पत्र क्र. ५७६१

दि. २२–१०–०७ ने डिपॉझिट रक्कम परतावा पाठविला. परंतू दि. ४–१०–०७ रोजी सदर धनादेश मयत शारदाबाई दाभाडे यांचे नांवावर काढणेत आला होता व व्याजाचा तपशील दिला नव्हता. सबब नाखुशीने दि. ६–१२–०७ ला स्वीकारला. दि. १८–१०–०७ रोजी संबंधित कार्यालयास अनामत रकमेवरील व्याजाबाबत कळविण्यात आलेले आहे दि. २९–१०–०७ च्या पत्राची प्रत ग्राहकास दि. १४–११–०७ ला देण्यात आले. अद्याप तक्रार निवारण झाली नाही व डिपॉझीटवरील ९ वर्षे ७ महिन्याचे व्याज अद्याप मिळालेले नाही. तक्रारदाराने दि. ५–३–०७ रोजी अर्ज दिल्यानंतर खाते बंद करण्यास कार्यवाहीस विलंब झालेमुळे, भरपाई रक्कम तक्रारदारास मिळावी व अर्जदारास तक्रार सोडवणूक करणेस दिलेल्या मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रासाबद्‌दल दंडात्मक कार्यवाही व्हावी अशी मागणी तक्रारदार यांचे तर्फे करणेत आली.

विरूध्द पक्षा तर्फे सांगण्यात आले की, तक्रारदार यांचा शारदाबाई वामनराव दाभाडे यांचे ठिकाणी स्वत:चे नांव बदल करणेबाबत अर्ज ५–३–०७ ला प्राप्त झाला. नुसार कार्यालयीन पत्र क्र. ४०५ दि. २१–३–०७ ने अनामत रक्कम भरणेस कोटेशन दिले, त्यावर तक्रारदार यांनी वकिलाची नोटीस देऊन अकारण्यात येत असलेल्या मिटरचे किंमत व अनामत रकमेबाबत आक्षेप घेतला. त्यामुळे कार्यालयाने २७–४–०७ रोजी ग्राहकास एक महिन्याचे बिलाइतके सुधारीत कोटेशन दिले, पूर्वीच्या माणसाचे नांवाचे डिपॉझिट पावत्या सादर करणेस सांगितले. परंतू कोटेशन रक्कम न भरता ग्राहकाने १९–७–०७ ला अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार केली. १३–७–०७ चे कार्यालयीन आदेशाने तक्रारदार यांचे नांव बदल ७–७–०७ पासून जारी करणेत आले आहे. याबाबत वेळोवेळी अनामत रक्कम भरणेस तक्रारदार यांनी चालढकल केलेमुळे कार्यवाहीस विलंब झालेचे सांगितले. तसेच मयत शारदाबाई वामनराव दाभाडे यांचे नांवावर डिपॉझिट रू. ३२०/– पा.क्र. १३७४४८३ दि. १६–१०–९७ व रू. २००/– पा.क्र. १०९७१५३ दि. ३०–४–९८ पैकी रू. ३२०/–चे व्याज नियमित वीज बिलातून वेळोवेळी वजावट करून घेतले आहे. तर रू. २००/– खात्यावर नजरचुकिने वर्ग झाली नव्हती ती दि. ४–८–०७ ला वर्ग केली व त्यावरील आकारलेले व्याज रू. ६५/– नोव्हेंबर २००७ च्या बिलात जमा केले. तसेच डिपॉझिट व्याजाबाबत पत्र क्र. १५६७ दि. १२–११–०७ अर्जदारास कळविले. अनामत रक्कम परतीसाठी ग्राहकाने ४–८–०७ ला अर्ज केला तो उपविभागाने १३–८–०७ ला विभागीय कार्यालयाकडे पाठविला. विभागीय कार्यालयाने पत्र क्र. ५७६५ दि. २२–१०–०७ ने डिपॉझिट परतावा रकमेचा चेक पाठविला. परंतू ग्राहकाने स्वीकारला नाही. नंतर तो रोखापाल यांचेकडे पाठविला. कार्यालयाचे इतर कर्मचा–यांनी ३०–११–०७, १–१२–०७ व ३–१२–०७ रोजी ग्राहकाचे घरी समक्ष जाऊन चेक हस्तांतरीत करणेचा प्रयत्न केला. अखेर दि. ६–१२–२००७ रोजी ग्राहकाने नाखुशीने सदर धनादेश स्वीकारला.

दरम्यान काढण्यात आलेल्या रक्कम परताव्याचा चेक चुकीने मयत शारदाबाई दाभाडे यांचे नांवे काढला गेला. याबाबत त्यांचे तक्रारदार यांचे सोबत एकत्रित बँक खाते आहे, चुकलेले नांव दुरूस्त करून देवदत्त वामनराव दाभाडे यांचे नांवे चेक काढून दिला व अशा प्रकारे तक्रारदाराचे तक्रारीचे सोडवणूक निरसन झालेचे नमूद करणेत आले.

# **आदेश**

८)  सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता अर्ज निकाली ठेवण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ( जी. सी. लेले ) | ( एस.आर बांबळे ) |
| सदस्य | सदस्य–सचिव |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |